Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# पंचायतराज व्यवस्थेतील पायाभूत घटक म्हणून ग्रामपंचायतीचे महत्व

**शिंदे सोपान मारोती**
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना:**

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची जी विशिष्ट व्यवस्था प्रस्थापित केली आहे त्या व्यवस्थेलाच 'पंचायतराज ' असे म्हटले जाते. ही पंचायतराज व्यवस्था ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची विशिष्ट अशी व्यवस्था आहे. या व्यवस्थेच्या माध्यमातून भारत सरकारने लोकशाही विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा करण्याचे धोरण ठरवून त्यासाठी १९५४ मध्ये पंचायतराज व्यवस्था स्थापन करण्याबाबत विचार करण्यासाठी एका समितीची स्थापना केली. या समितीने ग्रामपंचायतीची स्थापना करण्याची आणि त्यांना व्यापक अधिकार देण्याची शिफारस केल्यामुळे शासनाने लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्वास मान्यता दिली. खरे तर भारताचे केंद्र सरकार सुरुवातीपासूनच विकेंद्रीकरणास अनुकूल होते त्यानंतर मेहता समितीच्या शिफारशीमुळे या विकेंद्रीकरणासारख्या प्रश्नाला अधिकच चालना मिळाली.

बलवंतराय मेहता समितीने लोकशाही विकेंद्रीकरणाची जी त्रिस्तरीय व्यवस्था सुचविली होती त्याच व्यवस्थेला 'पंचायतराज' असे संबोधले जाऊ लागले. लोकशाही विकेंद्रीकरणाचा किंवा पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार करणारे राजस्थान हे भारतातील पहिले राज्य ठरले गेले. राजस्थान या घटक राज्याने १९५९ मध्ये पंचायतराज्य व्यवस्थेचा शुभारंभ केल्यानंतर आंध्रप्रदेश, ओरिसा, उत्तर प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र इत्यादी घटकराज्यांनीही त्यांचा स्विकार केला. महाराष्ट्र हे पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार करणारे देशातील नववे राज्य आहे.

पंचायतराज व्यवस्थेमुळे स्थानिक लोकांमध्ये स्थानिक कार्ये करण्याची आवड निर्माण होत असते कारण आपल्या स्थानिक समस्या स्थानिक स्तरावर निरसन करण्याचे कामही याच व्यवस्थेच्या माध्यमातून होत असते. म्हणूनच या पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून शासन लोकांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सत्तेत सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न करत असते. खरे तर पंचायतराज व्यवस्था ही भारतास नवीन नाही. भारतात अगदी प्राचीन काळापासून अशा प्रकारच्या पंचायतराज व्यवस्थेतील संस्था कार्यरत होत्या. या संस्थांना फार मोठा इतिहास लाभला आहे. म्हणजे त्यांचे अस्तित्व दिर्घकाळ टिकून राहिले होते आणि भारतीय समाज एकसंघ ठेवण्यात तसेच त्यांच्या काही महत्वाच्या गरजांची पूर्तता करण्यात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजाविली होती.

**पंचायतराज व्यवस्थेत ग्रामपंचायतीचे महत्व:**

पंचायत राज त्रिस्तरीय व्यवस्थेमधील तिसऱ्या स्तरावर म्हणजे ग्रामपातळीवर कार्य करणारी संस्था म्हणजे ग्रामपंचायत होय. या ग्रामपंचायतीची निर्मिती मात्र जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन घटकापेक्षा वेगळया पद्धतीने झाली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन संस्थाची स्थापना ‘महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ यानुसार करण्यात आली आहे. परंतू ग्रामपंचायत ही पंचायतराज्याचा एक घटक असली तरी वरिल अधिनियम अस्तित्वात येण्यापुर्वीपासूनच महाराष्ट्रात ग्रामपंचायती कार्यरत होत्या. महाराष्ट्रात किंवा पुर्वीच्या मुंबई प्रांतात ग्रामपंचायतीची स्थापना ब्रिटीश सत्तेच्या काळातच झाली होती त्यानंतर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ या कायद्याने ग्रामपंचायतीना अधिक स्पष्ट व सुसंघटीत स्वरुप दिले. राज्यातील ग्रामपंचायतीचा कारभार याच कायद्यान्वये चालविला जात आहे. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सन १९६२ मध्ये महाराष्ट्रात पंचायतराजची संकल्पना साकार झाल्यावर या पंचायतराज व्यवस्थेत ग्रामपंचायतीचा ही अंतर्भाव करण्यात आला. मुंबई ग्रामपंचायतीत अधिनियम १९५८ या कायद्यातील पाचव्या कलमात ग्रामपंचायतीच्या स्थापनेसंबंधी तरतुद आहे. या कलमात असे म्हटले आहे की, प्रत्येक गावात लोकसंख्या ६०० इतकी असावी लागते. ज्या खेड्यांची लोकसंख्या ६०० पेक्षा कमी आहे अशा दोन किंवा तीन खेड्यांची मिळून एक गट ग्रामपंचायत स्थापन करण्याची ही तरतुद आहे.

ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील ३८व्या कलमात सरपंचाचे अधिकार स्पष्ट दिले आहे. या कायद्यानुसार ग्रामपंचायती अंतर्गत विविध महत्वाचे निर्णय व कामाची अंमलबजावणी करण्याचे काम या पदाच्या माध्यमातून पार पाडली जातात. ग्रामपंचायतीची सर्व जबाबदारी सरपंचावर वरील कायद्यान्वये टाकण्यात आली आहे. त्या कायद्याच्या अनुषंगाने सरपंचाला विविध अधिकार व कार्य करावी लागतात. यामध्ये ग्रामपंचायतीची सभा बोलविणे, ग्रामपंचायतीने संमत केलेल्या ठरावाची आणि घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे, ग्रामपंचायतीचे अधिकारी व नोकर वर्गावर नियंत्रण व देखरेख ठेवणे, कायद्यातील तरतुदीप्रमाणे आवश्यक असलेले अहवाल, नियमांन्वये सरपंचाला जे अधिकार आहेत त्याचा वापर करून विविध कार्य पार पाडणे, ग्रामसभेची बैठक बोलावून त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे, शासनाच्या कोणत्याही निदेशाखाली देणे आवश्यक असतील अशी प्राप्ती प्रमाणपत्रे आपल्या सहीने आणि पंचायतीच्या मुद्रेनिशी देणे आदि अधिकार सरपंचाला असतात.

**निष्कर्ष:**

सरपंच हा ग्रामपंचायतीचा व पर्यायाने एका गावाचा राजकीय प्रमुख म्हणून काम करीत असतो. तो गावातून सर्वानुमते प्रत्यक्ष जनतेतून निवडून आला असल्याने त्याला गावाचे प्रश्न माहित असतात व त्यामुळे तो गावाच्या विकासासाठी चांगले काम करु शकतो असे अपेक्षित आहे. मुळत: पंचायत राज व्यवस्थाच त्या कामासाठी निर्माण करण्यात आलेली आहे. ग्रामस्तरावरील प्रश्नांची जाणीव अधिकारी व राज्य / देश स्तरावरील नेत्यांना / अधिकाऱ्यांना असतेच असे नाही त्यामुळे अधिकारांचे विकेंद्रीकरण करुन त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था निर्माण केल्याने ग्रामपातळीवर ग्राम विकासाचे अधिकार दिल्याचे दिसून येते. यामध्ये सरपंच हा ग्रामपंचायतीचा प्रमुख असल्याने ग्राम विकासाची जबाबदारी त्याच्यावर येते. सरपंच हा कुशल, सर्वसमावेशक व विकासाभिमुख दृष्टी असणारा असेल तर पंचायत राज व्यवस्था निर्मिती मागील प्रेरणा लक्षात घेऊ शकतो.

**संदर्भ:**


- महाराष्ट्र शासन (२००५): वाटचाल महाराष्ट्राची, सामान्य प्रशासन विभाग, शासकिय मुद्रणालय, मुंबई
- जोशी आर. पी. (२०१०): 'पंचायतो का संवैधानिकरण', कॉन्स्टीट्युशन लायजेशन ऑफ पंचायतीराज, रावत पब्लिकेशन, जयपुर.
- काकडे सुरेश (१९९८): पंचायतराज, प्राची प्रकाशन, मुंबई.
- गांधी, एम. के. (१९६२): ग्रामस्वराज्य, नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद
- पांडे, राम (१९८९): पंचायती राज, जयपूर पब्लिशिंग हाऊस, जयपुर.
- राठोड, गिरवर (२००४): भारत में पंचायती राज, पंचशील प्रकाशन, जयपुर.
- विभुते, भालबा (२००४): पंचायतराज व्यवस्था, मनोविकास प्रकाशन, मुंबई.
- Bhatnagar S. (1978): Rural Local Government in India, Life & Light Publication, New Delhi.
- Khan H. I. (1969): Government in Rural India, Asia Publication House, Bombay.
- Shrivastav, I.C. (2000): Empowering Panchayats for Good Governance, Yojna, New Delhi.